# शिक्षक मतदार संघ कोणाचे? शिक्षकांचे, संस्थाचालकांचे की राजकीय पक्षांचे...

**प्रकाश मा. पवार**
फर्ग्युसन कॉलेज पुणे
(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक व भारतीय राज्यघटनेचे अभ्यासक आहेत)

नुकतीच राज्यात पुणे, अमरावती विभागातील शिक्षक विधान परिषदेच्या मतदारसंघाच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले होते निकालानंतर मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे हे मतदार संघ कोणाचे आहे कारण दोन्ही' मतदारसंघात राजकीय पक्षांनी अक्षरशः हैदोस घातला होता. याच पार्श्वभूमीवर आजवर झालेल्या निवडणुकीचा आढावा घेऊन विश्लेषण करण्याची गरज आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताने संसदीय व संघराज्य शासन व्यवस्थेचा पुरस्कार केला अखिल भारतीय स्तरावर केंद्र सरकार तथा भारत सरकार कार्यरत आहे तर राज्यांच्या स्तरावर त्या त्या घटक राज्यात सरकार असते त्याप्रमाणे देशात ३० घटक राज्यांत राज्यांची सरकारे आहेत. राज्य सरकारांमध्ये दर्जा वाढावा म्हणून राज्यघटनेने घटक राज्यांना आपापल्या राज्यात विधान परिषद ठेवण्याचा अधिकार दिला आहे, म्हणजे विधानसभा आपल्या राज्यासाठी विधान परिषद निर्माण करण्याची किंवा बरखास्त करण्याचा अधिकार दिला आहे. त्याप्रमाणे सध्या भारतात महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश या घटक राज्यांत विधान परिषद आहेत.

विधान परिषदेचे स्थान राज्याच्या राजकारणात मोठे असते. ते वरिष्ठ सभागृह म्हणून मानले जाते. ते विद्वज्जनचे सभगृह म्हणूनही आहे. ह्या सभागृहातील सभासद थेट सामान्य जनतेतून निवडला जात नाही. विशिष्ट समूहातून ज्यांना राजकीय सामाजिक भान आहे, असेच त्याचे मतदार असतात. विधान सभेतील सभासदांतून, स्थानिक स्वराज संस्थेच्या सभासदांतून, शिक्षक, पदवीधरमधून आणि राज्याच्या राज्यपालांकडून नियुक्त केले जातात. त्यामुळे ह्या सभागृहालाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

तात्पर्य हे की, या सभागृहात प्रत्येक बिल चर्चा ही विवेकपूर्ण व्हावी, भावनेच्या

भरात कोणतेही बदल घडू नये, यासाठी हे सभागृह विशेष दक्ष राहिली. या भूमिकेतून घटनाकारांनी विधान परिषदेला राज्याच्या राजकारणात विशेष महत्त्व दिलं होतं. यात घटनाकारांनी पदवीधर आणि शिक्षक मतदारांना मतदार म्हणून काही उमेदवार निवडून देण्याची रचना केली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात विधान परिषदेत सात शिक्षक आणि सात पदवीधर उमेदवार निवडले जात आहेत. घटनाकारांनी या मतदारसंघाची रचना का केली असेल? याचा शोध घेताना असे दिसून येते की, जेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळालं आणि आपण लोकशाहीचा स्वीकार केला, तेव्हा आपला समाज प्रचंड अशिक्षित, मागासलेला होता. अशावेळी तज्ज्ञ, अभ्यासू प्रतिनिधी सभागृहात पाठवायचे असतील तर पदवीधरातून आणि शिक्षकांमधून पाठवल्यास शिक्षक पदवीधर नक्कीच विद्वतजनाना पाठवून देतील आणि या सभागृहाचा दर्जा उंचावेल अशा भूमिकेतून घटनाकारांनी या मतदारसंघाची रचना केली. ह्याप्रमाणे पदवीधर मतदारसंघातून ७, शिक्षक मतदारसंघातून ७ आणि राज्यपाल १२ अशा विद्वतजनाना नियुक्त करतील असे २६ आमदार हे विधान परिषदेची वैचारिक उंची वाढवतील, अशी अपेक्षा घटनाकारांनी व्यक्त केली होती. परंतु, गेल्या सत्तर वर्षांचा आढावा घेतला तर दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, एखाद-दोन अपवाद सोडला तर या मतदारसंघांतून विद्वज्जन सोडाच, पण अतिशय खुजी, कर्तृत्वहीन माणसे सभागृहात गेलेली आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे अभिप्रेत होतं, ते शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातून गेल्या सत्तर वर्षांत घडलेले नाही.

शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचा सर्वे केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येत होती की, बहुतेक शिक्षकांना आणि भावी शिक्षक आमदारांना घटनाकारांनी हे मतदारसंघ का निर्माण केले, त्याचे गांभीर्य दिसून येत नव्हते. बरेच शिक्षक हे या मतदारसंघातून शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे मतदारसंघ निर्माण केले आहेत, असेच सांगत होते. खरं म्हणजे समाजातल्या प्रत्येक घटकांचे प्रश्न असतात. त्यांना मतदारसंघात दिले नाहीत, असा प्रतिप्रश्न विचारल्यानंतर मात्र, घटनाकारांनी काही विशिष्ट हेतू ठेवूनच शिक्षक मतदारसंघ तयार केले आहेत, याची जाणीव होते. अशी भूमिका घेऊन हे मतदारसंघ निर्माण का झाले, हे गेल्या सत्तर वर्षांच्या निवडणुकीत एखाद-दोन अपवाद वगळता फारसं कोणी सांगण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे शिक्षक मतदार म्हणून त्याला त्याची भूमिका ही कळाली नाही. त्यामुळे तोही या निवडणुकीकडे उदासीनतेने पाहत होता.

या निवडणुकीत माध्यमिकवरचे सर्वच शिक्षक, ज्यांची तीन वर्षे पूर्ण झालेले आहेत आणि जे सेवेत आहेत, असेच शिक्षक मतदार असतात. प्रत्येक निवडणुकीला मतदाराची नोंदणी करणं आवश्यक आहे. त्यामुळे जो जेवढी जास्त नोंदणी करेल, त्याची निवडून येण्याची शक्यता अधिक असते. ही निवडणूक प्रक्रिया हा महत्त्वाचा घटक आहे आणि इथूनच राजकारण व्हायला सुरुवात होते. बऱ्याच शिक्षण संस्था इतर उमेदवारांना आपल्या संस्थेत नोंदणी करू देत नाहीत. आपल्या सोयीचे भावी उमेदवार असतील त्यांच्यासाठीच नोंदणी करतात. पुढचा मुद्दा तर फारच महत्त्वाचा आहे, या निवडणुकीत शिक्षक स्वतः पुढाकार घेऊन नोंदणी करत नाहीत. ज्या उमेदवारांना निवडणूक लढवायची आहे, तेच शिक्षकांची नोंदणी करून घेतात. या नोंदणीत मोठ्या प्रमाणात शिक्षक उदासीन असताना दिसतात. त्यामुळे जे आपल्याला मत देतील त्यांचीच नोंदणी होते. त्यामुळे फ्री अँड फेअर निवडणुकीला इथूनच बाधा पोहोचायला सुरुवात होते.

त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांच्या पाठीमागे यंत्रणा आहे किंवा जे निवडणूक यंत्रणा उभ्या करतील तेच या निवडणुकीत यशस्वी होऊ शकतात. बऱ्याचदा असे दिसून येते की, या संस्थाचालकांचा शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच दूषित आहे. ते शिक्षकाकडे शिक्षक म्हणून न पाहता नोकर पाहतात. त्याच्या गुणवत्तेचा अनादर करतात. अर्थात काही सन्माननीय संस्था त्याला अपवादही असतील, पण हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. आपल्या राज्यात १९७०च्या नंतर शिक्षण संस्थांचे स्वरूप बदलत गेले. त्यापूर्वी तळागाळातल्या गोरगरीब सामान्यांना शिक्षण मिळावे यासाठी शिक्षणाकडे एक सेवाभावी काम म्हणून संस्था काम बघत होत्या. त्याचा एक खूप चांगला इतिहास महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिक्षण विश्वामध्ये आढळतो. पण १९७०च्या नंतर हे स्वरूप बदललं, राजकारणाला साथ देण्यासाठी शिक्षण संस्था हातभर लावतात असा दृष्टिकोन घेऊन राजकारण्यांनी शिक्षण संस्थांची निर्मिती केली.

बरेचसे राजकारणी हे सरंजामी मानसिकतेतले असल्याने त्यांनी त्याच नजरेतून शिक्षकांकडे पाहिलं. त्यामुळे कितीही विद्वान, हुशार, होतकरू शिक्षक असला, तरी त्याला न्याय मिळेल याची खात्री वाटत नव्हती. उलट अशा स्वतंत्र विचाराच्या शिक्षकाचे अवमान कसा होईल याकडे संस्थाचालकांचा पाहण्याचा दृष्टिकोन राहिला. त्यामुळेच ग्रामीण भागातल्या किंवा सरंजामी शिक्षण व्यवस्थेतल्या संस्थांमधून अनेक गुणवान शिक्षकांची रया गेली. त्यांचं पोटेन्शन मारले गेले. नोकरीशी संबंध असल्यामुळे जरी काही गोष्टी पटत नसल्या तरीसुद्धा त्यांना स्वीकारावा लागल्या, त्यांच्या

राजकारणाला मूकसंमती द्यावी लागली, त्यामुळे शिक्षक मतदारसंघातील एका बाजूला शिक्षकांची उदासीनता आणि दुसऱ्या बाजूला संस्थाचालकांची सरंजामशाही या पेचात महाराष्ट्राचे शिक्षक मतदारसंघ अडकलेले दिसतात.

१९८५ नंतर मात्र शिक्षण हे केवळ सेवाभावी व्रत राहिला नसून, तो एक उत्तम असा व्यवसाय आहे आणि त्याकडे व्यावसायिकच अशी दृष्टीने पाहण्याची वृत्ती दिसून येऊ लागली. त्यामुळेच राज्यभरात विनाअनुदानित शिक्षण व्यवस्थेचा पाया घातला गेला. या विनाअनुदानित शिक्षण पद्धतीने शिक्षणाचं वाटोळं केलं आणि शिक्षकही अस्तित्व आणि अस्मिता यावर त्याचा परिणाम झाला या निवडणुकीवर तो दिसून येतो. निवडणुका आल्या की काही शिक्षक उमेदवारांना विनाअनुदानित शिक्षकांबद्दल इतका कनवाळा येतो आणि निवडणुका संपल्यानंतर ते ढुंकून ही पाहत नाहीत. या सगळ्या प्रक्रियेमुळे निवडणुकांवर शिक्षकांपेक्षा संस्थाचालकांचे वर्चस्व अधिक दिसते. त्यामुळे जरी घटनाकारांनी शिक्षकांच्या सदसद्विवेक बुद्धीला साद घालून जरी हे मतदारसंघ तयार केले असले तरीही या मतदारसंघांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव हा संस्थाचालकांचा कायम राहिला. पुणे विभाग मतदारसंघात रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, भारतीय विद्यापीठ या मोठ्या शिक्षण संस्था तशाच जिल्ह्यातील विविध जिल्हा प्रसारक मंडळ यांच्या प्रभाव असल्याने या मतदारसंघांवर संस्थाचालकांचे गारुड कायम राहिले. यापूर्वी कोणताही मोठा राजकारणी यात उमेदवार म्हणून लक्ष घालत नव्हता. त्याची दोन कारणं होती, एक म्हणजे मतदारसंघ खूप मोठा आहे. साधारणतः किमान दहा लोकसभा मतदारसंघ आणि साठ विधानसभा मतदारसंघ त्यात असल्याने आणि विखुरलेला असल्यामुळे तसेच हा मतदार सतत अस्थिर आहे. नव्याने भरती झालेला किंवा सेवानिवृत्त झालेला किंवा बदलीने स्थलांतरित झालेला असा मतदारसंघ असल्याने प्रत्येक वेळा बांधणी करावी लागते. त्याऐवजी जर एखाद्या विधानसभा मतदारसंघात पाच वर्षे बांधणी केली, तर त्याचे फायदे पुढची पंचवीस वर्षे मिळणार असल्याने या मतदारसंघाकडे कोणत्याही मोठ्या राजकारणी नेत्याने कधीही गांभीर्याने पाहिले नाही. पण मात्र या निवडणुकीत किंग मेकर म्हणून भूमिका बजावताना मात्र कायम दिसतात.

शिक्षक मतदारसंघांमध्ये हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, सीनियर कॉलेज, विद्यापीठातील शिक्षक, आश्रम शाळा तांत्रिक शाळेतील शिक्षक असे वेगवेगळ्या श्रेणीतील शिक्षक मतदार आहेत. त्यामध्ये त्यांचे प्रश्न वेगळे आहेत आणि त्या

सोडवणाऱ्या संघटनासुद्धा वेगवेगळ्या आहेत. यामध्ये माध्यमिक शिक्षकांचे प्राबल्य आहे. पण, त्यांची प्रभावी अशी संघटना नाही. संघटना जरी असली तरीही शिक्षक त्या संघटनेत सक्रिय नाहीत. या संघटनेचे स्वरूप फक्त पदाधिकाऱ्यांना मानसन्मान देण्यापूवतेच राहिले आहे. या निवडणुकीमध्ये वेगवेगळे जिल्हे असल्याने तिथले शिक्षण अधिकारी, सहसंचालक, विद्यापीठे, वेगवेगळ्या संघटनेचे बांधील आहेत. या सर्व संघटना एकत्र येऊन आपला एक उमेदवार आजपर्यंत देऊ शकले नाहीत. त्यामुळे जरी हे मतदारसंघ शिक्षकांची असले तरीही या मतदारसंघावर प्राबल्य कळत-नकळत शिक्षकांपेक्षा संस्थाचालकांचे अधिक राहिले.

सन १९९० सालापर्यंत शिक्षक मतदार संघाकडे राजकीय पक्षांनी फारसे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. १९७८ सालापर्यंत राज्यात काँग्रेस पक्षाचा विधानसभेत प्रभाव होता विरोधी पक्ष हा नगण्य होता. तीच अवस्था विधान परिषदे त्यामुळे पदवीधर शिक्षक या मतदारसंघात सत्ताधारी पक्षाने फारसे लक्ष घातल्याचे दिसून येत नाही. या मतदारसंघात विरोधी पक्षांनी लक्ष घालायला सुरुवात केली. महाराष्ट्रातील विरोधी पक्षाचे नेते तर पदवीधर मतदार संघातूनच निवडून आल्याचे दिसून येते. २००० सालानंतर ही परिस्थिती हळूहळू बदलायला लागली. या मतदारसंघावर सुरुवातीला मोठ्या शिक्षण संस्थांचा प्रभाव होता. पण २००० नंतर हा प्रभाव कमी झाला आणि छोट्या छोट्या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून आणि शिक्षक संघटना संघटनांच्या माध्यमातून या निवडणुका जिंकता येऊ शकतात असा संदेश जाऊ लागला. विशेषतः संस्थाचालक शिक्षकांना त्रास देतात त्यामुळे संस्थाचालकांचे प्रतिनिधी नको असा एक प्रवाहसुद्धा या निवडणुकीत पुढे येऊ लागला. विशेषतः शहरी मतदार हा स्वतंत्रपणे थोड्या धाडसाने पुढे येताना दिसत होता, अर्थातच त्याची संख्या कमी होती. त्यामुळे थोडासा मिश्र स्वरूपाचा होता पण गेल्या दहा-बारा वर्षात या मतदारसंघांचे स्वरूप पूर्णपणे बदलले. ज्या कारणासाठी घटनाकारांनी मिळाली. संस्थाचालक, राजकीय पक्ष यांची गट्टी जमली. त्यांनी शिक्षकांना वेठीस धरून निवडून येऊ शकतात अशी अटकळ शिक्षक काही राजकीय पक्षांचे लोक या मतदारसंघातून निवडून आलेले दिसतात. त्यामुळे सुरुवातीला शिक्षकांचा प्रतिनिधींचा असलेला हा मतदारसंघ पुढच्या काळात संस्थाचालक आणि आता राजकीय पक्षांच्या हातात गेल्याचा दिसतो.

२०२० च्या दोन्ही शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. त्या उमेदवारांच्या पाठीमागे आपली यंत्रणा लावली होती.

यामुळे शिक्षकांचा राजकीय ध्रुवीकरण होत होते. असे राजकीय ध्रुवीकरण होणे योग्य की अयोग्य, याबाबत वेगळी चर्चा होऊ शकते. पण शिक्षकात पक्षीय राजकारण येणार ही फारशी चांगली बाब नाही. पूर्वी ताई, दादा, साहेब यांची नावं सांगून उमेदवार मतांची याचना करत होता. आता थेट दादा, ताई, अक्का, भाऊ, निवडणुकींना गंभीर असं पक्षीय स्वरूप आले. पूर्वी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक या महाराष्ट्रात राजकीय नेत्यांनी कधीही शिक्षक मतदारसंघात हस्तक्षेप केल्याचे दिसत नाही. उलट शिक्षणातल्या चांगल्या माणसाला त्यांनी संधी दिल्याचे दिसते. आज मात्र चित्र बदललेले आहे. शिक्षणाची देणं-घेणं नसलेला केवळ पैशाच्या जोरावर पक्षात संघाच्या कार्यकर्त्यांचं पुनर्वसन म्हणून या मतदारसंघाकडे राजकीय लोक पाहू लागले आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे. यापूर्वी राजकीय पक्ष या निवडणुकीत अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करतो, पण आता तो थेट हस्तक्षेप करत असल्याने ज्या उद्दिष्टासाठी मतदारसंघ तयार करण्यात आले आहेत, त्यालाच धक्का पोहोचला आहे, असं दिसून येते.